# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २१/११/२०२३ चे ००.०१ ते १६.०० वा.

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे राजापेठ अप क्र ९८३/२०२३ कलम ३२४, ५०६,३४ भादवी | कृष्णार्पण कॉलनी रामदास विघे यांचे घरासमोर अमरावती | घ.ता.वेळ दि. २०/११/२०२३ चे रात्री १०-३० वा दा.ता.वेळ दि. २१/११/२०२३ चे ०२-३४ वा. | सिध्देश गोपाल बंग वय २० वर्ष रा. कृष्णार्पण कॉलनी रामदास विघे यांचे घरासमोर अमरावती मुळ रा. आसेगाव पुर्णा | अनोळखी ४ पुरूष | हकीकत अशा प्रकारे आहे यातील फिर्यादी हे रामदास विघे यांच्याघरी दोन वर्षापासुन भाड्याने राहत असुन बिएससी च्या शेवटच्या वर्गात शिक्षण घेत आहे. नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीचे रूम समोर ४ मुले दोन मुली सोबत उभे होते . फिर्यादीला त्याच्या आईचा फोन आल्याने फोन वर बोलण्यासाठी रुम च्या बाहेर गेला. काही वेळा नंतर त्या दोन मूली तेथुन निघून गेल्या . रुम समोर उभे असलेले चार मूलापैकी एक मुलगा फिर्यादीच्या बाजूला येवून बसला व म्हणाला की तू त्या मूलींना छेडले तेव्हा फिर्यादीने म्हटले की मी त्या मूलींना व तुम्हाला ओळखत नाही. मी त्या मुलींना छेडले नाही. तरी सुध्दा फिर्यादीचे काही न ऐकता मारहाण करण्यास सुरवात केली. फिर्यादीचा मीत्र सोडवण्यास गेला असता त्याला सूध्दा मारहाण केली. फिर्यादीने त्याला विरोध केला असता हाताणे, लाथा बुक्याणे व हाताच्या कड़याने मारहाण केली व तो म्हणाला की, माझे नाव भैय्या यादव आहे मी नवाथे येथे राहतो. कूणाला सांगायचे असेल तर सांग असे बोलुन धमकावले. अशा फिर्यादी चे जबाणी रिपोर्ट व मेडी .सर्टी. वरुण सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र १३८४/२३ कलम ४५४,३८० भादवि | ११ बि चिंतामणी नगर अर्जुन नगर जवऴ नागपुर रोड अमरावती | दि २०-११-२३ चे १९-५० वा ते दि २१-११-२३ चे २१-१५ वा दि २१-११-२३ चे ०२-०४ वा | सुमेध नंदकिशोर घाटोऴ वय ३० वर्षे धंदा नौकरी रा ११ बि चिंतामणी नगर अर्जुन नगर जवऴ नागपुर रोड अमरावती | अज्ञात इसम | यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि हे अमरावती मध्ये त्यांचे नातेवाईक बोबडे यांच्या घरी जेवण करायाला बोलाविले असतांना सर्व परीवार हा जेवण करायला गेला असता घराला संपुर्ण दरवाजाला लॉक लावुन गेले होते तसेच व घरी १ ते दिड तासाने परत आल्याने त्यांना घराचे मेन गेट चे कुलुप तोडलेले दिसले व घराचे दरवाजाचे बाजुचे काच फोडला व ति काच अस्तव्यस्ता पडलेले होते तसेच फि चे भाच्याने ११२ डॉयल वर कॉल केला असता ोलिस मदतीला धावुन आले पोलिसांसमोर व ड्रेसिंग टेबल च्या ड्रॉवर मध्ये असलेले फि चे पतीचे कानातील सोन्याचे वेल ४ ग्रॅम चे कि अं १९,०००/- २) पत्नीचे नाकातील नथ २ ग्रॅम चे कि अं ६०००/-रु चे ३) फि चे पत्निच्या पायातील तोरड्या २० ग्रॅम च्या कि अं १५००/-रु ४) व पायातील जोडवे कि अं १०००/- चे ५) फि चे आईचे कानातील वेल ३ ग्रॅम सोन्याचे कि अं १०,०००/-रु चे ६)व फि चे आईचे ३ ग्रॅम चे कानातले कि अं १२,०००/-रु चे व फि ची अंगठी ४ ग्रॅम व फि यांची सोन्याची ४ ग्रॅम ची अंगठी कि ् १५,०००/-रु ची व चांदीची अंगठी १० ग्रॅम ची कि ् ३०००/-रु टी व नगदी कॅश ड्रॉवर मध्ये ठेवलेली ५०० रु च्या ५४०००/-रु असा एकुण माल १,२१,५००/-रु चा माल कुणीतरी अज्ञात चोरट्याने खिडकीची काट फोढुन आत प्रवेश करुन चोरुन नेला अश्या पि टे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र १३८५/२३ कलम ४५४,४५७, ५११ भादवि | अमरावती | दि १६-११-२३ चे १३-०० वा ते १७-११-२३ चे २२-०० वा दरम्यान दि २१-११-२३ चे ०३-५७ वा. | एक महीला | अज्ञात इसम | यातील नमुद घता वेळी व ठिकाणी यातील फि हे नागपुर येथे नातेवाईकाचे तेरविकरीता गेले असता फि हे घराला कुलुप लावुन गेले होते व ते नागपुर गेल्यावनर घरात कुणीही शेजारच्या लोकांना दिसले नाही तेव्हा त्यांनी फिर्यादी यांना फोन करुन विचारणा केली तेव्हा फि ह्या म्हणाल्या कि आम्ही सपुर्ण परीवारासह नागपुर येथे आलो आहोत व घराला कुलुप लावले आहेत तेव्हा त्या शेजारील लोकांनी म्हटले कि घराचे मेन दरवाजाचे कुलुप कोंडा तुटलेला आहे त्यावर फि यांनी अमरावती येथे राहत्या घरी येवुन पाहीले असता त्यांना दरवाजाचा कुलुप कोंडा तुटलेला दिसला व बेडरुम मधील कपाटाचे कुलुप तोडलेले दिसले व कपाटातील कपडे सामान व अस्ताव्यस्ता दिवाण वर टाकलेले दिसले घरातील काहीही वस्तु अथवा दागिणे चोरीला गेले नाही चोरट्यानी फि घरी नसतांना चोरी करण्याचा प्रयत्न केला.अश्या फि टे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे फ्रेजरपुरा अम अप क्र.६७५/२० २२ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि.२०.१०.२० २२ चे२३.३० वा ते दि.२१.१०.२०२ २ चे ०६.०० वा पावेतो दि.२१.१०.२०२ २ चे ११.४८ वा | एक महीला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांची दि.२०/१०/२०२२ रोजी रात्री ११.३०वा चे सुमारास फिर्यादी यांची गाडी क्र.एम एच २७सि क्यु २६७९अँक्टीव्हा ६जी बी ५६एससीव्ही एलएलओएलटीडी काळ्या रंगाची च्याचा चेसीस नं.एमइ४जेएफ९१३एएलडब्लु ००३०४७ ईंजिन नंबर जे एफ ९१इ डब्लु ०००२८९२ अशा वर्णनाची किंमत अंदाजे ३५,०००/-रूपये ची मोपेड गाडी घरासमोरील रोडजवळ लॉंक न करता बाहेर ठेवली होती व फिर्यादी व फि.च्या घरातील सर्व मंडळी जेवन करून झोपुन गेले व दि.२१/१०/२०२२ रोजी सकाळी ०६.००वा चे सुमारास फि.यांनी उठुन घरासमोर येवुन पाहीले असता नमुद गाडी दिसुन आली नाही गाडीचा आजुबाजुला शोध घेतला असता अध्याप पावेतो मिळुन आली नाही कोणितरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून गुन्हा दाखल |

## विश्वासघात (फसवणुक)

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो ठाणे सिटी कोतवाली अप क्र.५३६/२३ कलम ४१९,४२० भादवी | ईर्विन दवाखाना परिसर अमरावती | दि.१५.११.२०२ ३ चे १०.३० वा ते दि.२१.११.२०२ ३ चे १३.३० वा दरम्यान | चंद्रशेखर अंबादास पवार वय ४८ वर्ष रा बेलोरा ता चांदुर बाजार जि अमरावती | मिर्झा जफर बेग मिर्झा वय ३३ वर्ष रा उस्मानिया मस्जिद बस स्टॅन्ड रोज अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, दि.१५.११.२३ रोजी सकाळी १०.३० वा दरमान ईर्विन दवाखाना अम.येथे आलो तेथिल कर्म यांनी मला सांगितले की, बाहेररुनऑनलाईल फॉम भरुन माझे जवळ या ता्यावरुन मी दवाखाना बाजुला असलेले झेरॉक्स सेटंर वर गेलो तेथे ऑनलाईन फॉम भरला फॉम भरल्याची पावती घेवुन पुन्हा ईर्विन दवाखाना येथे परत आलो तेथिल कर्मचारी यांनी सांगितले की,दवाखान्याची पावती काढुन आना त्यानंतर ३३ नंबर वर गेलो डॉ.सा हजर नवहते ते बंद होते तेथुनमी घरी जायला निघालो तेव्हा मला एक ईसम भेटला व त्याने म्हटले की माझे नाव मिझ ा आहे मी तुमचे अपंगाचे सर्टि काढुन देतो मला २०००/- रु द्यावे लागेल मी त्या दिवशी सदर ईसमास पैसे दिले नाही त्याने मला माझा मोबाईल नंबर मागितला मी त्याला नंबर दिला व घरी निघुन गेलो.दुस-या दिवशी दि.१६.११.२३ रोजी दुपार पर्यंत वारंवार माझ्या फोन वर फोन लावला व म्हणाला की तुम्ही ताबडतोब ईर्विन दवाखाना येथे सर्टिफिकेट बनविन्या करीता निघुन या तो वारंवार फोन लावित असल्याने मी दुपारी ०३.०० वा. गावावरुन ईर्विन दवाखाना येथे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आलो.मिर्झा याला ईर्विन दवाखाना येथे भेटलो व त्याने मला म्हटले की, घरी चला त्यावरुन त्याने मला उसमानिया मस्जिद येथे नेले व २०००/-रु मागितले व मोबाईल मागितला व २०००/- रु दिले माजा मोबाईल औपन करन्यास सांगितले मोबाईल ओपन केला मिर्झा जवळ दिला व म्हटले की सर्टिफिकेट साठी उद्याला या असे म्हणुन मोबाईल माझे ताब्यात दिला व घरी निघुन गेला दि.१७.११.२३ रोजी माझे मोबाईल वर फोन लआला की तुम्ही ताबडतोब ईर्विन दवाखाना येथे निघुन या मि सकाळी १०.३० वा आलो .त्यने मला मोबाईल मागीतला व म्हटले की,तुमचे सर्टिफिकेट तुमचे मोबाईलवर आले. किंवा नाही हे मला चेक करायाचे आहे त्यावरुन मी त्यांना मोबाईल ओपन करुन दिला . थोड्या वेळाने मिर्झा याने म्हटले की,सर्टिफिकेट तुमचे मोबाईलवर आले नाही.तुम्ही आला परत जा.. त्यानंतर मी गावाला परत आलो.दि.१८.११.२३ रोजी पुन्हा मिर्जा याचा फोन आला व म्हणाला की,तुम्ही ईर्विन दवाखाना येथे या तर मी दुपारी ०३.०० वा दरम्यान ईर्विन दवाखाना येथे आलो असता व मिर्झा यांना भेटलो व मोबाईल मागितला मोबाईल व त्याने म्हटले की तुमचे सर्टि आले नाही.तर तुन्ही परत जा मी गावाला गलो.दि.२०.११.२३ रोजी सायंकाळी ०७.३० वा माझा पुतन्या नामे लुकेश रविशेखर पवार याला म्हटले की,ए टि एम घेवुन पैसे काढुन आन पुतन्या ए टि एम मध्ये गेला असता ए टि एम मध्ये २०००/- रु विड्रॉल केले असता पैसे नसल्याने पैसे निघाले नाहीअसे मला माझे पुतन्याने सांगितले तरमाझे पुतन्याने मोबाईल वरुन अकांउंट बॅलेन्स चेक करायचा प्रयत्न केला असता मोबाईल मधुन फोन पे चे अँप डिलीट मारलेला दिसला. नंतर माझे पुतन्याने माझे मोबाईल मध्ये फोन पे अँप इंन्स्टॉल केला व ट्राजेक्सन चेक केले अशता माझे बँक ऑपफ इंडिया मधुन दि.१६.११.२३ रोजी ११.४८ मि.१५.रु चा मोबाईल जि ओ प्रिपेड रिचार्ज मारला दि.१६.१११२३ रोजी ०१/२० मिली.मोबाईल नंबर वर् १५१०.४० रु चा व्हि आय पोस्पेड बिल पेड केले .पुन्हा दि.१६.११.२३ रोजी ०१.२३ वा मि.मो क्र. वर ६०००/-रु चे पठाण या अकांउंटवर उमेर मिर्झा जफर बैग मिर्झा या नावावर फोन पे ने ट्रान्सफर केले .दि.१७.११.२३ रोजी ०३.२७ मि.ने १०.०००/-रु .उमेर मिर्झा जफर बेग मिर्झा या अकाउंट वर फोन पे ने ट्रान्सफर केले.दि.१८.११.२३ रोजी ११.४६ मि.नी . उमेर मिर्झा जफर बैग मिर्झा या नावावर फोन पे ने १०,०००/- रु ट्रान्सफर केले असे एकुण २७,५२५/-रु उमेश मिर्झा जफर बेग मिर्झा याने ईर्विन दवाखाना येथे मोबाईल घेवुन माझे अकाउंट मधिल पैसे ट्रान्सफर केले असे मला दि.२०.११.२३ रोजी बँकचे स्टेटमेंट पाहिले नंतर माहीती झाले .दि.२१.११.२३ रोजी मी माझा भाउ संजय अंबादास पवार ,अमि्त जगदिश वानखडे ,नंदकुमार त्र्यंबकराव काळे ,प्रफुल्ल पाडुरंग महल्ले ,लुकेश संजय पवार अशे आम्ही उमेर मिर्झा जफर बेग मिर्झा यांचे घरी उस्मानिया मस्जिद येथे गेलो व मी त्याला म्हटले की माज्या अकांऊउट मधु न २७,५२५/- रु ट्रान्सफर का केले ,की तर त्याने मला मह्टले की,तुमचे मी अपगांचे सर्टिफिकेट काढुन देतो म्हणुन तुमचे पैसे मी तुम्हाला न सांगता माझे अकाउंटवर तुमचे मो .द्वारे ट्रान्सफर केले.त्यानंतर उमेर मिर्झा जफर बेग मिर्झा रा उस्मानिया मर्जिद अम.याने माझी फसवणुक केली म्हणुन आम्ही सर्वानी त्यांना पकडुन गाडीत बसवुन पोलीस स्टेशनला आनले .वरील प्रमाने मला अपंगाचे सर्टिफिकेट काढणे करीता ईर्वीनि दवाखाना येथे आले तेव्हा मला उमेर मिर्झा जफर बेग मिर्झा हा मला भेटला व त्याने मला सर्टि फिकेट काढुन देतो असे बोलला त्याकरीता त्याने माझे क़डुन नगदि २०००/- रु घेतले व त्याने मला सांगतिले की, तुमचे मोबाईल वर ऑनलाईन अपंगाचे सर्टिफिकेट येनार आहे.बरेच दिवस झाले नंतर सुध्दा मला अंपगाचे सर्टिफिकेट बाबत काहीच माहीती मिळाली नाही.त्यामुळे मी अम.येथे आलो.व उमेर मिर्झा जफर बेग मिर्जा याला भेटलो तेवव्हा त्याने माझ्या जवळछा मोबाईल घेवुन मोबाईल मध्ये अपंगाचे सर्टिफिकेट डाउनलोड करुन देतो असे बतावणी करुन माझे फोन पे अकांउंट वरुन त्याचे अंकाउट वर ला मला काही न सांगता एकुण २७,५२५/-रु ट्रान्सफर केले . व नगदी २०००/-रु एकुण २९,५२५ रु ची माझी फसवणुक केली करीता त्यांचे विरुध्द रिपोर्ट देते आहे.अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे बडनेरा अप क्र ८०३/२३ कलम ३ महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणस प्रतिबंध करण्याकरीता अधि-१९९५ | बडनेरा मेनरोड च्या स्ट्रीट लाईटच्या पोलवर पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा | दि.२०/११/२३ चे ०५/१५ वा<br><br>दाखल ता वेळ- दि.२१/११/२३ चे | सलीम खान वय-५६वर्ष रा- सहायक श्रेत्रीय अधिकारी दक्षीण प्रभाग ४ बडनेरा मनपा | एशीयाड सर्कस चे जाहीरात चे पोस्टर चिटकवणरा अज्ञात इसम | पो स्टे बडनेरा अर्जदार याने बडनेरा अमरावती रोडवरील पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा मेनरोडच्या स्ट्रीट लाईटच्या पोलवर आज दि.२०/११/२३ रोजी सायकांळी ०५/१५ वा च्या पाहणीमध्ये एशीयाड सर्कस चे पो स्टर मनपाची कुठलीही परवानगी न घेता जाहीराती करीता लावण्यास आल्याचे दिसु न आले. त्याबाबतचे छायाचित्र सोबत संलग्न आहे एशीयाड सर्कसवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी फि च्या जाबनी रि वरुन सदरचागुन्हा दाखल |
| ०२ | पो स्टे सीटी कोतवाली अप क्र ५३३/२३ कलम २८५ मपोका | बस डेपो अमरावती | घटना ता वेळ दिनांक २०/११/२३ चे २२.४०वा<br>दाखल ता वेळ दिनांक २१/११/२३ चे ०१.२६वा | सरतफे स पो उप नि राजेश सपकाळ ब.नं.६२४ पो स्टे सीटी कोतवाली अमरावती शहर | नितीन रमेशराव भोसले वय ३८ वर्ष पा हमालपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांची दि.२०.११.२३ रोजी २१.०० वा ते ०८.०० वा पावेतो पेट्रोलिंग ड्युटि असतांना कोतवाली हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान नमुद घ ता वेळी व ठिकाणी एक ईसम नितिन अंडा सेंटर नावाच्या हात ठेल्यावर सार्वजनिक ठिकाणी मानवी जिवन धोक्यात येईल अगर अन्य कोनत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान होन्याचा संभव असेल ईतक्या बेदारक व हयगईपण वापरतांना मिळुन आला टपरीमध्ये ज्वालाग्राही पदार्थ असलेले गॅस सिलेन्डर भारत कंपनिचे वापरतांना मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव विचारले अशता त्याने आपले नाव वरिल प्रमाने सांगितले .सदर ईसम हा सार्वजनिक ठिकाीणी मानवी जिवीत धोक्यात येईल अथावा दुखापत पोहोचेल अशा प्रकारे अग्निजन्य गॅस सिलेंडर चा वापर हयगईने व बेदरकारपणे करतांना मिळुन आल्याने सदर ईसमाविरुध्द कलम २८५ भादवी प्रमाने कार्यवाही करन्यात आली. |
| ०३ | पो स्टे सीटी कोतवाली अप क्र ५३४/२३ कलम २८५ मपोका | रेल्वे स्टेशन अमरावती | घटना ता वेळ दिनांक २०/११/२३ चे २३.१५वा<br>दाखल ता वेळ दिनांक २१/११/२३ चे ०१.३७वा | सरतफे स पो उप नि राजेश सपकाळ ब.नं.६२४ पो स्टे सीटी कोतवाली अमरावती शहर | सागर दिलीपराव उके वय ३२ वर्ष रा चिचफैल संतोशी माता मंदिर जवळ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांची दि.२०.११.२३ रोजी २१.०० वा ते ०८.०० वा पावेतो पेट्रोलिंग ड्युटि असतांना कोतवाली हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान नमुद घ ता वेळी व ठिकाण सागर दिलीपराव उके वय ३२ वर्ष रा चिचफैल संतोशी माता मंदिर जवळ अमरावती सार्वजनिक ठिकाणी मानवी जिवन धोक्यात येईल अगर अन्य कोनत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान होन्याचा संभव असेल ईतक्या बेदारक व हयगईपण वापरतांना मिळुन आला टपरीमध्ये ज्वालाग्राही पदार्थ असलेले गॅस सिलेन्डर भारत कंपनिचे वापरतांना मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव विचारले अशता त्याने आपले नाव वरिल प्रमाने सांगितले .सदर ईसम हा सार्वजनिक ठिकाीणी मानवी जिवीत धोक्यात येईल अथावा दुखापत पोहोचेल अशा प्रकारे अग्निजन्य गॅस सिलेंडर चा वापर हयगईने व बेदरकारपणे करतांना मिळुन आल्याने सदर ईसमाविरुध्द कलम २८५ भादवी प्रमाने कार्यवाही करन्यात आली |
| ०४ | पो स्टे सीटी कोतवाली अप क्र ५३५/२३ कलम २८५ मपोका | बस डेपो अमरावती | घटना ता वेळ दिनांक २०/११/२३ चे २३.४५वा<br>दाखल ता वेळ दिनांक २१/११/२३ चे ०१.४३वा | सरतफे स पो उप नि राजेश सपकाळ ब.नं.६२४ पो स्टे सीटी कोतवाली अमरावती शहर | अरुण दामोदर शेरेकर वय ६२ वर्ष रा हमालपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांची दि.२०.११.२३ रोजी २१.०० वा ते ०८.०० वा पावेतो पेट्रोलिंग ड्युटि असतांना कोतवाली हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान नमुद घ ता वेळी व ठिकाण अरुण दामोदर शेरेकर वय ६२ वर्ष रा हमालपुरा अमरावती बस डेपो परिसर सार्वजनिक ठिकाणी मानवी जिवन धोक्यात येईल अगर अन्य कोनत्याही व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान होन्याचा संभव असेल ईतक्या बेदारक व हयगईपण वापरतांना मिळुन आला टपरीमध्ये ज्वालाग्राही पदार्थ असलेले गॅस सिलेन्डर भारत कंपनिचे वापरतांना मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव विचारले अशता त्याने आपले नाव वरिल प्रमाने सांगितले .सदर ईसम हा सार्वजनिक ठिकाीणी मानवी जिवीत धोक्यात येईल अथावा दुखापत पोहोचेल अशा प्रकारे अग्निजन्य गॅस सिलेंडर चा वापर हयगईने व बेदरकारपणे करतांना मिळुन आल्याने सदर ईसमाविरुध्द कलम २८५ भादवी प्रमाने कार्यवाही करन्यात आली. |